नवे शहर
अधिक बातम्यांसाठी आमच्या
वेबसाईटला भेट द्या
www.naveshahar.com


आपलं
# नवे शहर
नवी मुंबईतील विश्वासार्ह दैनिक
₹२




वर्ष : २८ | अंक : २७१ | पाने : ४, रविवार, २० मार्च २०२२ | ठाणे | RNI No.61792/94 | Post.Reg.:NMB/136/2022-2024/Vashi MDG P.O.

## पुष्पक नगर करिता पूरक चटई क्षेत्र निर्देशांक ना-हरकत प्रमाणपत्र

### 'सिडको'कडून प्रमाणित कार्यपध्दती निश्चित



**नवी मुंबई** : 'सिडको'तर्फे विमानतळ प्रकल्पबाधितांना पुष्पक नगर या पुनर्सवन-पुन:स्थापना क्षेत्रात वाटपित करण्यात आलेल्या भूखंडांकरिता पूरक चटई क्षेत्र निर्देशांकासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरिता प्रमाणित कार्यपध्दती (एसओपी) निश्चित करण्यात आली आहे.

'सिडको'तर्फे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांकरिता सामाजिक आणि भौतिक पायाभूत सुविधांनी परिपूर्ण असणारा पुष्पक नगर नोड विकसित करण्यात येत आहे. पुष्पक नगर नोडमध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन-पुन:स्थापनेकरिता 'सिडको'कडून भूखंड वाटपित करण्यात आले आहेत.

पुष्पक नगरचा विकास नगरविकास विभागाने २ डिसेंबर २०२० पासून अंमलात आणलेल्या एकत्रीकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीनुसार नियंत्रित होत आहे. युडीसीपीआर मधील तरतुदींनुसार 'सिडको'ने मूळ १.५ चटई निर्देशांकाव्यतिरिक्त पूरक चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय केला आहे. आपल्या भूखंडांकरिता पूरक चटई क्षेत्र निर्देशांक ना-हरकत प्रमाणपत्रे जलद गतीने देण्यात यावीत, अशी विनंती विमानतळ प्रकल्पबाधितांनी 'सिडको'ला केली होती.

सदर विनंतीस सकारात्मक प्रतिसाद देत 'सिडको'कडून पूरक चटई क्षेत्र निर्देशांकाकरिता ना-हरकत प्रमाणपत्रे प्रदान करण्यासाठी प्रमाणित कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. यानुसार मुख्य भूमी-भूमापन अधिकारी विभागाकडून विहित नमुना तयार करण्यात आला आहे. 'सिडको'च्या वित्त विभागाच्या मंजुरीनंतर, पूरक चटई क्षेत्र निर्देशांक ना-हरकत प्रमाणपत्राकरिता केलेल्या विहित नमुन्यातील अर्जावर प्रक्रिया करण्यात येईल. त्यानंतर अर्जदाराच्या मागणीचा विचार करुन व्यवस्थापनाकडून त्याकरिता मंजुरी देण्यात येईल. संपूर्ण प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात येईल.

दरम्यान, 'सिडको'तर्फे पूरक चटई क्षेत्र निर्देशांक ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरिता प्रमाणित कार्यपध्दती निश्चित करण्यात आल्यामुळे पुष्पक नगर नोडच्या विकासास गती मिळणार आहे.

## 'पारसिक हिल'च्या उतारावर अनावश्यक वृक्षारोपण

### हरितप्रेमींचा आक्षेप; भूस्खलनाचा धोका

**नवी मुंबई** : पारसिक डोंगराच्या उतारावर अगोदरपासून असलेल्या वृक्षांची छाटणी करुन तिथे नवे वृक्षारोपण करण्याचा घाट सध्या नवी मुंबई महापालिकेने घातला आहे. त्यातच बिल्डरांकडून बेसुमार उत्खनन सुरु असल्याने या क्षेत्रात भविष्यात भूस्खलन होण्याची भिती हरितप्रेमी व्यक्त करत आहेत.

पारसिक डोंगराच्या भागात पूर्वीपासून असलेले वृक्ष कापून ते जाळून उतारालगत रांगेमध्ये रोपांची लागवड करण्यात आल्याने या हास्यास्पद स्थितीकडे पर्यावरण-केंद्री एनजीओ 'नाटकनेक्ट फाऊंडेशन'ने लक्ष वेधले आहे.

डोंगर उतारावर महापालिकेकडून वृक्षारोपण करण्यात आल्याचे महापालिकेकडून 'नाटकनेक्ट'ला स्पष्ट करण्यात आले. ल्युब्रिझॉल कंपनीच्या सीएसआर प्रकल्पाद्वारे केवळ ६,००० झाडे लावण्याची जबाबदारी नवी मुंबई महापालिकेकडे असल्याचे उपायुक्त जयदीप पवार यांनी सांगितले. डोंगर कापण्यात येतो आहे, झाडांची कत्तल सुरु आहे, त्याविषयी आम्हाला घेणे-देणे नसल्याचे उपायुक्त जयदीप पवार म्हणाल्याचे 'नाटकनेक्ट फाऊंडेशन'चे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले.



सदर ठिकाणी असलेल्या झाडांची कत्तल करतानाच त्यांना बेचिराख करून नव्याने करण्यात येणाऱ्या लागवडीमागे नेमके कोणते शहाणपण आहे? असा प्रश्न हरितप्रेमींनी उपस्थित केला आहे. एकीकडे डोंगराला भुईसपाट करण्याचे काम बिल्डरांकडून होत असताना भलतीकडे वृक्ष लागवड करुन नक्की कोणत्या प्रकारचे सौंदर्यीकरण करण्यात येते आहे, याचे कोडे वरिष्ठ महापालिका

> "पारसिक डोंगराचा भाग अगोदरच हिरवागार आहे. 'नाटकनेक्ट फाऊंडेशन'चे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले. पारसिक हिल क्षेत्रात खाणकाम सुरु असलेल्या परिसरात म्हणजे ठाणे-बेलापूर पट्ट्याच्या दिशेने डोंगराच्या उत्तरेकडील भागात वृक्षारोपण होणे अपेक्षित आहे. मात्र, झाडांची लागवड भलतीकडे करण्यात आली आहे.
> -बी.एन.कुमार, संचालक-नाटकनेक्ट फाऊंडेशन.

(उर्वरित पान ४ वर)

## घणसोली 'सेंट्रल पार्क'मध्ये पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ

### ७ दिवसात पाणीपोई न बसविल्यास आंदोलन; 'मनसे'चा इशारा



**नवी मुंबई** : कोट्यावधी रुपये खर्च करुन घणसोली मधील नागरिकांकरिता नवी मुंबई महापालिकेने घणसोली रेल्वे स्थानकासमोर सेक्टर-३ मध्ये सेंट्रल पार्क उद्यानाची निर्मिती केली आहे. मात्र, सेंट्रल पार्क येथे पिण्याच्या पाण्यासाठी कोणतीही सोय नाही. त्यामुळे 'सेंट्रल पार्क'मध्ये पिण्याच्या सोय करण्यासाठी 'महाराष्ट्र

(उर्वरित पान २ वर)

## नेरुळ, जुईनगर मधील रस्त्यांची डागडुजी करण्याची मागणी

**नवी मुंबई** : नेरुळ आणि जुईनगरमधील कामकाजामुळे रस्त्यावर पडलेले खड्डे बुजवून रस्त्याची डागडुजी करण्याची मागणी 'नवी मुंबई जिल्हा काँग्रेस'च्या सचिव विद्या भांडेकर यांनी महापालिका आयुक्त आणि नेरुळ विभाग अधिकाऱ्यांकडे निवेदनातून केली आहे.

मल:निस्सारण वाहिनी, जलवाहिनी, गॅस केबल, इंटरनेट काम अथवा अन्य कामांसाठी रस्त्यावर खोदकाम केले जाते. विकासकामांसाठी रस्त्यावर खोदकाम करणे अनिवार्य आहे,



ते सर्वांना मान्य आहे. तरीही काम पूर्ण झाल्यावर खोदकाम

(उर्वरित पान ४ वर)

## सोने तारण ठेवून ५ ग्राहकांनी बँकेला घातला ३४.५६ लाखांना गंडा

**नवी मुंबई** : कामोठे येथील दि सह्याद्री सहकारी बँकेमध्ये ५ ग्राहकांनी १ किलो १९९ ग्रॅम वजनाचे बनावट सोने तारण ठेवत बँकेकडून एकूण ३४ लाख ५६ हजार रुपयांचे कर्ज घेऊन बँकेची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे सोन्याचे मुल्यांकन करणाऱ्या बँकेच्या अधिकृत सोनारासोबत संगनमत करुन सदर सर्वांनी फसवणूक केली आहे. त्यामुळे कामोठे पोलिसांनी बँकेच्या मुख्य कार्यकरी अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पाच ग्राहकांसह सोन्याचे मुल्यांकन करणारा सोनार तसेच बँकेचा तत्कालीन व्यवस्थापक या सर्वांविरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे.

कामोठे येथील दि सह्याद्री सहकारी बँकेमार्फत गोल्ड लोनसह विविध प्रकारची कर्ज दिले जात असून गोल्ड लोन साठी येणाऱ्या कर्जदारांच्या सोन्याचे मुल्यांकन आणि तपासणी अरविंद अमृते नामक सोनार करुन देत होता. त्यानुसार बँकेचे व्यवस्थापक ग्राहकांना सोने तारण कर्ज मंजूर करत होते. बँकेतील खातेदारक असलेली मिनाक्षी भोईटे या महिलेने २०१८ मध्ये २९९ ग्रॅम ६५० मिलीग्रॅम वजनाचे सोने तारण ठेवून बँकेकडून ९ लाख ९० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र, सदर महिला कर्जाची रक्कम भरत नसल्याने बँकेने मनाक्षी भोईटे हिला संपर्क साधून लेखी नोटीस पाठवून कर्जाची रक्कम भरण्यास सांगितले होते. पण, तिने बँकेच्या अधिकाऱ्यांना प्रतिसाद दिला नव्हता.

त्यामुळे बँकेच्या अधिकाऱ्यांनी मिनाक्षी भोईटे हिला विश्वासात घेऊन तिच्याकडे विचारपूस केली असता बँकेतील सोन्यांचे मुल्यमापन आणि तपासणी करणारा सोनार अरविंद अमृते याने सदरचे कर्ज घेतल्याचे आणि तारण सोने देखील त्याचेच असल्याचे

(उर्वरित पान २ वर)

## 'कोकण रेल्वे'तर्फे ३ उन्हाळी स्पेशल गाड्यांची घोषणा



**नवी मुंबई** : उन्हाळ्यातील प्रवाशांची अतिरिक्त गर्दी दूर करण्यासाठी कोकण रेल्वे महामंडळ 'मध्य रेल्वे'च्या सहकार्याने एप्रिल ते जून या कालावधीत ३ विशेष गाड्या सोडणार आहे.

त्यानुसार गाडी क्रमांक ०१४०३/०१४०४ पुणे जंक्शन-करमाळी-पुणे जंक्शन आठवडा विशेष (विक्ली स्पेशल) ८ एप्रिल ते ३ जून या कालावधीत प्रत्येक शुक्रवारी सोडण्यात येणार आहे. त्यानुसार ०१४०३ गाडी सायंकाळी ५.३० वाजता पुणे येथून सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता करमाळी येथे पोहोचेल. तर ०१४०४ करमाळी-पुणे गाडी १० एप्रिल ते ५ जून या कालावधीत प्रत्येक रविवारी सकाळी ९.२० वाजता करमाळी येथून सुटून त्याचदिवशी रात्री ११.३५ वाजता पुणे जंक्शन येथे पोहोचेल.

या गाडीला लोणावळा, कल्याण, पनवेल, रोहा, माणगांव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डे, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, अडवली, राजापूर रोड, वैभववाडी, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड आणि थिवीम स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे.

गाडी क्रमांक ०१४०६ करमाळी-पनवेल ९ एप्रिल ते ४ जून या कालावधीत प्रत्येक शनिवारी रोजी सकाळी ९.२० वाजता सुटून त्याचदिवशी रात्री ८ वाजता पनवेल येथे पोहोचेल. तर गाडी क्रमांक ०१४०५ पनवेल-करमाळी ९ एप्रिल ते ४ जून दरम्यान प्रत्येक शनिवारी रोजी रात्री १० वाजता पनवेल येथून सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता करमाळी येथे पोहोचेल.

या विशेष गाडीला थिवीम, सावंतवाडी रोड, कुडाळ, सिंधुदुर्ग रोड, कणकवली, वैभववाडी, राजापूर रोड, अडवली, रत्नागिरी, संगमेश्वर रोड, सावर्डे,

(उर्वरित पान ३ वर)

## भाजपा पदाधिकाऱ्यांकडून आ.मंदाताई म्हात्रे यांचा सत्कार



**नवी मुंबई** : सीबीडी-बेलापूर, सेक्टर-१५ए येथे शासकीय हॉस्पिटल आणि मेडीकल कॉलेज उभारण्यासाठी 'सिडको'कडून सवलतीच्या दरात भूखंड उपलब्ध केला. वाशी येथे महाराष्ट्र भवन निर्माण करण्याकरिता महाराष्ट्र शासनाकडून चालू अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद करुन घेतली. बेलापूर जलवाहतुकीच्या वॉटर टॅक्सीचे दर कमी व्हावे याकरिता शासनाच्या माध्यमातून ३ वर्षासाठी टॅक्स माफ करुन दिला, याबद्दल 'बेलापूर'च्या आमदार सौ. मंदाताई म्हात्रे यांचा भाजपा महिला मोर्चा आणि भाजपा उत्तर भारतीय मोर्चा यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी 'भाजपा महिला आघाडी'च्या नवी मुंबई शहर अध्यक्षा दुर्गा डोख, 'भाजपा युवा मोर्चा'चे जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे, माजी महापौर सुषमा दंडे, दिलीप तिडके, जयश्री चित्रे, विकास सोरटे, कल्पना छत्रे, सुहासिनी नायडू, जयवंत तांडेल, राजेश

(उर्वरित पान ३ वर)

## चारित्र्याचा संशय; विटभट्टी कामगाराकडून पत्नीची हत्या



**नवी मुंबई** : चारित्र्याच्या संशयावरुन एका विटभट्टी कामगाराने आपल्या पत्नीच्या डोक्यामध्ये विटेने हल्ला करुन तिची हत्या करुन पलायन केल्याचा प्रकार होळीच्या दिवशी घडला आहे. दिपक उर्फ पिंटु विठ्ठल दिवा (३६) असे या विटभट्टी कामगाराचे नाव असून पनवेल तालुका पोलिसांनी त्याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.

आरोपी दिपक उर्फ पिंटु विठ्ठल दिवा पनवेल तालुक्यातील चिंचवली येथील दशरथ भगत यांच्या विटभट्टीवर मोलमजुरी करुन आपल्या कुटुंबासह त्याच ठिकाणी झोपडीत रहात होता. दिपक आपली पत्नी बारकु हिच्यावर संशय घेत असल्याने त्यांच्यामध्ये नेहमी भांडण होत होते. त्यांचे भांडण सोडविण्यासाठी जाणाऱ्या व्यक्तीवर देखील तो संशय घेत होता. बारकु हिचे तिचा मावस भाऊ स्वप्नील आणि मामे भाऊ अक्षय यांच्यासोबत अनैतिक संबंध असल्याचा दिपकला संशय होता. यावरुनच तो

(उर्वरित पान ३ वर)

## पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेतील १४ आरोग्यकर्मींचा सन्मान



**नवी मुंबई** : राष्ट्रीय लसीकरण दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिकेच्या वतीने राष्ट्रीय पल्स पोलिओ कार्यक्रमात उत्तम कामगिरी करणाऱ्या १४ फ्रंटलाईन आरोग्य कर्मचाऱ्यांचा नागरी आरोग्य केंद्रनिहाय गट पातळीवर प्रशस्तीपत्र आणि मानचिन्ह देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

१६ मार्च १९९५ रोजी राष्ट्रीय स्तरावर पोलिओ लसीकरण मोहिमेला सुरुवात झाली. त्या अनुषंगाने १६ मार्च रोजी राष्ट्रीय लसीकरण दिवस साजरा करण्यात येतो. या वर्षी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असून त्यानिमित्त आजादी का अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे शासन स्तरावरुन सूचित करण्यात आले होते. त्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रातील २३ नागरी आरोग्य केंद्रांचे क्षेत्रनिहाय ७ गट करुन प्रत्येक गटातील ज्या एएनएम आणि आशा स्वयंसेविका यांनी नुकत्याच २७ फेब्रुवारी २०२२ रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत सर्वाधिक चांगले काम केले आहे,. अशा २१ फ्रंटलाईन आरोग्य कर्मचाऱ्याना महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनानुसार विशेष कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

यामध्ये सीबीडी, करावे सेक्टर-४८ नेरुळ या नागरी आरोग्य

(उर्वरित पान ४ वर)

## खाजगी कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची ऑनलाईन फसवणूक



**नवी मुंबई** : अज्ञात सायबर चोरट्याने खाजगी कंपनीतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याला कंपनीचे चेअरमन असल्याचे भासवून त्याच्यासोबत व्हॉटस्ॲप वरुन चॅटींग करीत ४ लाख ५० हजार रुपये किंमतीचे ॲमेझॉन पे गिफ्ट खरेदी ऑनलाईन पाठविण्यास सांगून त्यांची फसवणुक केल्याचा प्रकार घडला आहे. सानपाडा पोलिसांनी या सायबर चोरट्या विरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणात फसवणूक झालेले सुरेश गोपालकृष्णन सानपाडा येथे राहण्यास असून ते खारघर मधील एका खाजगी कंपनीत वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. १३ मार्च रोजी सुरेश घरी असताना सायंकाळी त्यांच्या व्हॉटस्ॲपवर मिस्ड कॉल आला होता. सदर कॉलची त्यांनी तपासणी केली असता, तो त्यांच्या कंपनीच्या चेअरमन वर्तिका शुक्ला यांचा असल्याचे तसेच त्याच्यावर त्यांचा फोटो असल्याचे त्यांना निदर्शनास आले. त्यामुळे कंपनीचे चेअरमन शुक्ला यांनी नवीन घेतलेल्या नंबरवरुन कॉल केला

(उर्वरित पान ३ वर)

# स्मरणयात्रा








**प्रसिध्दीच्या पलिकडचे साधे, फारसे नाव न लाभलेले, तरीही अनेकांच्या उपयोगी पडलेले कृतार्थ जीवन जगलेलेही कैकजण असतात. त्यांनी आपल्या तारुण्याची, उमेदीची सोनेरी वर्षे कुटुंबासाठी, समाजासाठी खस्ता खाण्यात घालवली असतात. हे सारं करताना म्हातारपण कधी आलं, विविध जीवघेण्या रोगांनी कधी ग्रासलं हे त्यांचं त्यांना कळतपण नाही. आणि एक दिवस मृत्यु त्यांना आपल्यातून उचलून नेतो. अशांच्या भरपूर गर्दीच्या अंत्ययात्रा निघत नाहीत की साधी शोकसभाही कुणी आयोजित करत नाही. तो विशिष्ट परिवार आणि मोजके सखेसोबती सोडल्यास कुणाला त्यांच्या मृत्युने फारसा फरकही पडत नाही. पण म्हणून त्यांच्या जाण्याचे दु:ख हलके, कमी प्रतिचे, कम अस्सल वगैरे असते का?**




सदर मजकूर लिहायला घेताना माझ्या अवतीभवती होळीची गाणी वाजत होती. भारतीय दिनदर्शिकेप्रमाणे व हिंदु रितीरिवाजांनुसार फाल्गुन महिन्यात पौर्णिमेला येणारा शेवटचा सण म्हणजे होळी. गेली दोन वर्षे भारतवासियांची होळी घरच्या घरी बंद स्वरुपात अडकली होती. ती यंदा रात्री किमान दहा वाजेपर्यंत तरी मुक्त करण्यात आली होती. यानंतर बरोबर पंधरा दिवसांनी फाल्गुन अमावस्येनंतर चैत्र शुक्ल १ या दिवशी प्रारंभ होणाऱ्या चैत्र महिन्याचा पहिला दिवस म्हणजे गुढीपाडवा. या दिवसाने नव्या वर्षाची सुरुवात झाली असे समजण्याचा प्रघात आहे व १ जानेवारीला नववर्ष सुरु होते असे न मानणारे गुढीपाडव्यावर ठाम असतात. ही होळी व त्यानंतरची धुळवड मला २००६ सालच्या नवी मुंबईतील घणसोली येथील दंगलीची व त्यात पोलीसी गोळीबारात नाहक बळी गेलेल्या जगदीश पाटील व संतोष गुप्ता या दिवंगतांची आठवण करुन देते. कोणत्याही भानगडीशी, गटातटाशी, कुरापतीशी कसलाही संबंध नसलेले हे दोघेजण केवळ बघ्याच्या भूमिकेत बाहेर गेले व गोळीबारात जीव गमावून बसले. तर ते असो.

जन्म कुठे घ्यावा हे जसे आपल्या हाती नसते.. तसेच मृत्यु कधी व कुठे यावा हेही आपल्या हाती अजिबात नसते. जन्माला आलेला प्रत्येकजण मृत्यु पावणार आहे हे सुर्यप्रकाशाइतके स्वच्छ असले तरी आपल्या प्रिय व्यक्तीला कधी मृत्युने गाठूच नये अशीच बहुतेकांची इच्छा असते. विशेषकरुन आपले माता-पिता, आपले भावजीवन समृध्द करणारे चित्रपट तारे-तारका, गायक-गायिका, संगीतकार, खेळाडू अशांचा कोणत्याही वयात आलेला मृत्यु आपल्याला बेचैन करुन जातो. फार मागचा नाही..केवळ गेल्या दोन वर्षांचा कालावधी जरी पाहिला तरी आपण कुणाकुणाला कायमचे गमावले आहे याची यादी अस्वस्थ करणारी आहे. करोनाने आपल्याला नजरकैदेत ठेवले होते. पण आपली नजर चुकवून २०२० साली आधी २९ एप्रिलला इरफान खान गेला; तर लगेच ३० एप्रिलला ऋषी कपूरने एक्झिट घेतली. त्यापाठोपाठ १७ मे २०२० रोजी विख्यात मराठी साहित्यिक रत्नाकर मतकरी यांनी जगाचा रंगमंच सोडला. 'चिफ ऑफ डिफेन्स स्टाफ' बिपिन रावत यांना ८ डिसेंबर २०२१ या दिवशी अपघाती मृत्यु आला. २०२२ या वर्षाची सुरुवातही तशी दु:खद वृत्तानेच झाली. मागील वर्षीच ज्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते त्या 'अनाथांची माय' सिंधुताई सपकाळ यांनी अनेक अनाथ मुलांना पुन्हा पोरके करुन दु:खसागरात लोटले. पिढीतील बूजुर्ग अभिनेत्री रेखा कामत यांना ११ जानेवारी रोजीच आपण गमावले. 'कहोना प्यार है' या सुपरडुपर हिट चित्रपटाची लोकप्रिय गाणी लिहीणाऱ्या इब्राहिम अश्क १६ जानेवारी २०२२ या दिवशी अल्लाला प्यारा झाला. तर पंडित बिरजू महाराज यांची पाऊले १७ जानेवारीला कायमची थिरकायची थांबली.

पण ही पडझड एवढ्यावरच थांबणारी नव्हती. विस्मृती विकाराने गेली अनेक वर्षे ख्यातनाम अभिनेत्री सौ सीमा देव यांना सतावले होते. परंतु त्यांच्या ६० वर्षांच्या प्रदीर्घ वैवाहिक जीवनाची वाटचाल रमेश देव यांनी वयाच्या ९३ व्या वर्षी ३० जानेवारी २०२० रोजी हे जग सोडल्याने थांबली. अस्वस्थ वातावरण, प्रदूषण, भेसळ, महागाई, वाढते अपघात, रोगराई यामुळे हल्ली अनेकांना ६० वर्षे नीट जगताही येत नाही, तिथे या युगुलाला चक्क ६० वर्षांचे वैवाहिक साहचर्य लाभले ही हेवा वाटायला लावणारी बाब आहे. यंदाचा फेब्रुवारी महिना अनेकांना विसरणे अवघड आहे. त्यातही या महिन्याची ६ तारीख. कारण गेली सुमारे सात-आठ दशके भारतवर्षातील कानसेनांच्या कानांची तृप्ती करणारा आवाज आपण कायमचा गमावून बसलो. भारतरत्न लता मंगेशकर यांना करोनाने ग्रासले होतेच; वयही नव्वदीपार पोहचले होते. त्यांनी नश्वर देहाचा त्याग केला. पण गेल्या चार पिढ्या त्यांनी गायिलेल्या विविध गाण्यांमुळे भारावल्या तर आहेतच; पण येणाऱ्या काही पिढ्यांनाही त्या आवाजाची महती जाणवत राहील. कारण त्या आवाजाची धनीण जरी हे जग सोडून गेलेली असली तरी तंत्रज्ञानामुळे तो आवाज तुमची आमची कायम साथ देणार आहे. सोबत राहणार आहे. महाभारत या महामालिकेत भीम ही भूमिका करणारा खेळाडू-अभिनेता प्रवीणकुमार सोबती याने ७ फेब्रुवारी रोजी या जगाचा निरोप घेतला. त्या पाठोपाठ विख्यात निर्माते दिग्दर्शक रवि टंडन (अभिनेत्री रविना टंडनचे वडिल) यांना ११ फेब्रुवारी २०२२ या दिवशी मृत्युने गाठले. अनहोनी, मजबूर, खेल खेल मे, खुद्दार असे त्यांचे अनेक सिनेमे रसिकांच्या पसंतीस उतरले होते. १२ फेब्रुवारीस विख्यात उद्योगपती राहुल बजाज यांनी जगाच्या व्यवहारातून कायमची निवृत्ती पत्करली. रोजगारनिर्मिती व उत्पादनांचा दर्जा याबाबत चोखंदळ असणाऱ्या राहुलजींचे या राज्याच्या जडणघडणीतील योगदान कुणीही कधीही विसरु शकणार नाही.

यानंतर हिंदी चित्रपट संगीत सृष्टीतील 'गोल्डन मॅन' गायक-संगीतकार अलोकेश तथा भप्पी लाहिरी यांनी १५ फेब्रूवारीला 'चलते चलते मेरे ये गीत याद रखना' म्हणत आपल्या साऱ्यांना 'अलविदा' केला. वेगळ्या बाजाचे संगीत त्यांनी हिंदी सिनेमाजगतात आणून ते लोकप्रिय केले. १९८० च्या दशकात जीतेंद्र-श्रीदेवी-जयाप्रदा–कादरखान-शक्ती कपूर-अरुणा ईराणी यांच्यासारख्यांच्या चमूचे अनेक दाक्षिणात्य धाटणीचे साचेबध्द सिनेमे आले. ते यशस्वीही ठरले. त्या यशात भप्पीदांचा सिंहाचा वाटा होता, हे कुणालाही मान्य व्हावे. यानंतर या मार्च महिन्याच्या ४ तारखेला लेग स्पिनचा जादुगार शेन वार्न हा ख्रिस्तवासी झाला. वास्तविक पाहता ५२ हे काही या जगाची खोळपट्टी सोडून जाण्याचे वय नव्हे. पण तसे झाले खरे. विख्यात मराठी अभिनेत्री वत्सला देशमुख यांनीही १२ मार्च आपल्या देहाचा 'पिंजरा' येथेच सोडून इहलोकाची वाट धरली. संध्या या अभिनेत्रीच्या त्या भगिनी व रंजना या अभिनेत्रीच्या त्या मातोश्री. त्यांच्या अन्य दोन अपत्यांनाही अकाली मृत्युने गाठले होते; आता वत्सलाताईही गेल्या.

प्रसिध्दी लाभलेल्या, झगमगाटी जीवन जगलेल्यांच्या मृत्युची चर्चा होते, बातम्या येतात. टीव्ही चॅनेल्सनी त्यांच्यावर निर्माण केलेले विशेष भाग प्रसारित केल्याने त्यांच्या जीवनाचा पट रसिक-प्रेक्षक पाहतात. वर्तमानपत्रे त्यांच्यावर विविध मान्यवरांचे पानेच्या पाने भरुन स्मरणलेख प्रसिध्द करतात. नामांकित लोक त्यांना श्रध्दांजली अर्पण करतात. हे सारे आपण पहात असतो. त्यांच्या मृत्युच्या तारखांसह ते लक्षात ठेवतो. त्यांच्या अंतरण्याने हळहळतो, दु:खी कष्टीही होत असतो. पण या प्रसिध्दीच्या पलिकडचे साधे, फारसे नाव न लाभलेले, तरीही अनेकांच्या उपयोगी पडलेले कृतार्थ जीवन जगलेलेही कैकजण असतात. त्यांनी आपल्या तारुण्याची, उमेदीची सोनेरी वर्षे कुटुंबासाठी, समाजासाठी खस्ता खाण्यात घालवली असतात. हे सारं करताना म्हातारपण कधी आलं, विविध जीवघेण्या रोगांनी त्यांना कधी ग्रासलं हे त्यांचं त्यांना कळतपण नाही. आणि एक दिवस मृत्यु त्यांना आपल्यातून उचलून नेतो. अशांच्या जाण्याने समाजात खळबळ माजत नाही. भरपूर गर्दीच्या अंत्ययात्रा निघत नाहीत. कुठे बंद पाळला जात नाही की साधी शोकसभाही कुणी आयोजित करत नाही. तो विशिष्ट परिवार आणि मोजके सखेसोबती सोडल्यास कुणाला त्यांच्या मृत्युने फारसा फरकही पडत नाही. पण म्हणून त्यांच्या जाण्याचे दु:ख हलके, कमी प्रतिचे, कम अस्सल वगैरे असते का? अशांच्या जाण्याने पोरके बनलेल्या त्या परिवारातील सदस्यांना जाऊन विचारा. याचे उत्तर मिळेल. या जगाचा निरोप घेताना वलय, प्रसिध्दी, नावलौकिक, झगमगाट यापैकी काहीही वाट्याला न आलेल्या सर्वांना या सरत्या वर्षाच्या शेवटच्या सणानंतरचे वंदन व गुढीपाडव्याला सुरु होणाऱ्या नव वर्षानिमित्त जात, धर्म, प्रान्त, भाषा यांच्या पलिकडे जाऊन सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

# राज्यपाल कसले, हे तर शकुनीमामा?

**जे राज्य छत्रपती शिवरायांना दैवत मानतं, ज्या राज्यात महात्मा ज्योतिबांची आणि सावित्रीबाईंची मनोभावे पूजा केली जाते, त्यांच्याविषयी आकलनाच्या बाहेर जाऊन वक्तव्य करण्याची राज्यपाल कोश्यारी यांची कृती तर वयोविकृतीला कारण ठरते आहे. राज्यभर याविरोधात आगडोंब होऊनही भाजप एका शब्दात प्रतिकिया देत नाही, याचा अर्थ राज्यपाल कोश्यारी आणि भाजपच्या मनात महाराष्ट्राविषयी काय शिजत असेल हे लक्षात घेतलं पाहिजे.**






राज्यात सरकार कोणाचं याहून आपण त्या सरकारचे पालक आहोत, याचं भान अजूनही राज्याचे पालक असलेल्या राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना राहिलेलं नाही. सांगताना सरकार माझं म्हणायचं आणि सरकारच्या निर्णयांचा जाणीवपूर्वक दुस्वास करायचा, अशी वृत्ती कोश्यारी यांच्याकडून सातत्याने घडते आहे. मुख्यमंत्री उध्दव ठाकरेंकडून हिंदुत्वाचा हिशोब मागणाऱ्या कोश्यारींना राज्यात भाजपचं सरकार हवं आहे. शिवसेना नसेल तर राष्ट्रवादी चालेल, इतकी घायकुती दस्तरखुद्द राज्यपालांना असेल तर त्यांच्याकडून भाजपेतरांना फारशा अपेक्षा करता येऊ शकत नाहीत. राज्यपाल ही संविधानाने लोकशाहीला दिलेली स्वतंत्र यंत्रणा असली तरी तिलाही कायद्याची काही बंधनं असतात. ही बंधनं झुगारून राज्यपाल वागणार असतील, तर असला राज्यपाल नसलेला बरा, असंच म्हणता येईल. खरं तर अशा कठीण परिस्थितीत राज्यपालांना परत बोलवण्याची मागणी राष्ट्रपतींकडे केली जाते. अशी मागणी होणं हा राष्ट्रपतींवरील एकार्थी अविश्वास म्हटला जातो. कारण राज्यपाल हे राष्ट्रपतींचे प्रतिनिधी म्हणून कारभार हाकत असतात. अशावेळी आपल्याविषयी वैरभावना राष्ट्रपतींच्या दरबारात जाणार नाही, याची खबरदारी राज्यपालांनी घ्यायची असते. पण या राज्यपालांना राष्ट्रपतींच्या मान-अवमानाचंही काही पडलेलं दिसत नाही. जेव्हा राज्यपाल असे उडपटांग वागतात तेव्हा राष्ट्रपतींनीच त्यांची जागा दाखवायला हवी. मात्र महाराष्ट्राबाबत हे घडत नाही. आपलं सरकार नाही म्हणून त्या सरकारला काम करू द्यायचं नाही, ही राज्यपालांची मानसिकता कमालीची विद्रेष निर्माण करणारी बनली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या फटकाऱ्याने यावर शिक्कामोर्तब झालं आहे.

विधानसभा अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत गुप्त मतदानाऐवजी उघड मतदान करण्याच्या बदलाला आक्षेप घेणाऱ्या गिरीश महाजन यांच्या याचिकेने राज्यपालांच्या एकूणच वर्तनाचा निकाल लागला आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल कसे लहरी आणि आपमतलबी आहेत, हे न्यायालयाच्या अनुमानाने स्पष्ट झालं. निवडणूक पध्दत बदलली म्हणून लोकशाहीचा गळा घोटल्याच्या आक्षेपाची न्यायालयाने पुरती रेवडी उडवल्यावर खरं तर याचिका मागे घेण्याचा निर्णय महाजन यांनी घ्यायला हवा होता. मात्र सत्तेची हाव इतक्या पराकोटीला गेली की येनकेन प्रकारेन महाविकास आघाडीची सत्ता उलथवणं इतकाच उद्देश त्यांचा राहिलेला दिसत होता. ज्या राज्यपालांसाठी महाजनांनी हे उपद्व्याप केले त्या राज्यपाल कोश्यारींनीच आपल्या पदाची गरीमा राखलेली नाही, हेही न्यायालयाच्या निकालाने दाखवून दिलं. राज्यपाल कोट्यातील १२ आमदारांच्या निवडीच्या मुद्यावर न्यायालयाने खडे बोल सुनावल्यावर आमदारांची यादी संमत करून पाठवली जाण्याची अपेक्षा होती. मात्र ते न करणाऱ्या राज्यपालांच्या अधिकाराचं निमित्त करत महाजन यांनी न्यायालयालाच शहाणपणा शिकवण्याचा प्रयत्न केला. अध्यक्षपदाची निवडणुकीसाठी लोकशाहीचे गळे काढणाऱ्या महाजन यांना १२ आमदारांच्या निवडीचे कसे काय वाटत नाही, या खड्या सवालाने महाजनांची बोलती बंद झाली. यानंतर राज्यपाल कोश्यारी शहाणे होतील, अशी अपेक्षा होती. पण तीही फोल ठरली. सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अध्यक्षीय निवडणूक घेण्यास राज्यपालांनी अजून संमती दिलेली नाही. यावरून राज्यपाल कोणत्या मार्गाने कारभार हाकत आहेत, हे दिसून येतं. राज्यपालाने राज्य सरकारबरोबर किती ताणून धरावं, याला काही मर्यादा असतात. या मर्यादा कोश्यारी यांनी पायदळी तुडवल्या आहेत. राज्यघटना चांगल्या लोकांच्या हाती गेली तर तिचं सोनं होईल आणि चांगली राज्यघटना विकृतांच्या हाती गेली तर तिची माती होईल, घटनेची निर्मिती करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेवटच्या भाषणात व्यक्त केलेल्या भावनांची महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला आठवण होत असेल. महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या महाराष्ट्र सरकारविषयीच्या एकूणच मानसिकतेने घटनेविषयीच्या बाबासाहेबांचे विचार किती प्रगल्भ होते हे लक्षात येतं. राज्यपाल कोश्यारी किती पक्षपाती आहेत, याचा साऱ्या महाराष्ट्राने घेतलेल्या अनुभवानंतर याची दखल मुंबई उच्च न्यायालयाला घ्यावी लागली. यावरून राज्यपाल कोश्यारी यांची कृती आणि उक्ती यातील फरक उघड झाला आहे.

न्यायालयाच्या पहिल्या फटकाऱ्याकडे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी दुर्लक्ष केलं. आता दुसऱ्या ताशेऱ्यानंतर तरी त्यांनी जागं व्हावं. घटनेचा अंमल हा एकाकी पध्दतीने करायचा नसतो, हे जेव्हा कोश्यारींना कळेल तेव्हाच त्यांच्याविषयीचा ग्रह दूर होईल. खरं तर राज्यपाल पदाचं महत्व कायम राहील, असा कारभार राजभवनात झाला पाहिजे. तो करता येत नसेल तर स्वत: राज्यपालांनीच पद सोडलं पाहिजे. पण या राज्यपालांना सत्ता भाजपसाठी राबवायची आहे. महाराष्ट्राचं राजभवन हे ठराविक पक्षाच्या वावराचं ठिकाण होत असतं तेव्हा राजभवनाचं हसं होतं. या पदावर येणारी व्यक्ती ही कुठल्या ना कुठल्या पक्षाशी वा विचारांशी बांधील असू शकते. काही हरकत नाही, तो माणसाचा स्वभाव असतो. पण हा स्वभाव इतरांवर लादता येत नाही. मंत्रिमंडळातील मंत्री राज्यपालांच्या भेटीला जातात तेव्हा त्यांना भाजपमध्ये प्रवेश घेण्याची स्वत: राज्यपाल गळ घालतात तेव्हा याचा अर्थ कळायला वेळ लागत नाही. सरकारने शिफारस केलेल्या एखाद्या व्यक्तीवर आक्षेप नोंदवण्याचा अधिकार राज्यपालांना जरूर आहे. ते यासाठी सरकारला जाबही विचारू शकतात. पण चिरकाल तसं करता येत नाही. अशा व्यक्तीविषयी आक्षेप नोंदवण्याऐवजी सरकारने शिफारस केलेल्या सगळ्याच नावांना विरोध करणं हे व्यवस्थेला अभिप्रेत नाही. राज्य सरकार आणि राज्यपाल यांचे अधिकार कोश्यारींना कोणी सांगावे? सत्तर वर्षांच्या राजवटीत काँग्रेसने नेमलेल्या राज्यपालांनी असं केलं असतं तर स्वत: राज्यपाल आणि त्यांच्या प्रत्येक कृतीचं समर्थन करणाऱ्या भाजप नेत्यांनी ते दाखले दिले असते. राजकारणाचे बाळकडू घेणारे कोश्यारी याबाबत काँग्रेसकडेही बोट दाखवू शकणार नाहीत. त्याकाळच्या एकाही राज्यपालाने घटनेला काखेत घेण्याची हिंमत केली नाही. एक ठराविक काळापर्यंत शिफारस केलेल्या व्यक्तीचं नाव बदलायला सरकारला राज्यपाल भाग पाडू शकतात. मात्र त्याचा अतिरेक झाला की त्याचा फटका बसणं स्वाभाविक आहे. खारं तर याबाबत स्वत: राष्ट्रपतींनीच पुढाकार घेऊन कोश्यारींचे कान ओढायला हवे होते. आपण दिलेल्या अधिकाराचा अशा प्रकारे कोणी फायदा घेणार असेल तर त्याची दखल राष्ट्रपती घेत असतात. तसं न झालं तर काळ सोकावतो. आज जो कोश्यारींमुळे सोकावलाय.

राज्यपाल हे न्यायालयाला बांधील नसतात हे जरी खरं असलं तरी जेव्हा अशा ठिकाणी बसलेली व्यक्ती संविधानाला गुंडाळण्याचे उद्योग करते तेव्हा त्यांना कर्तव्याची जाणीव करून द्यावीच लागते. घटनात्मक जबाबदाऱ्यांचे पालन करणं हे त्या त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांचं आणि देशातल्या नागरिकांचंही कर्तव्य आहे. या कर्तव्यात कोणी कसूर केली तर घटनेची पायमल्ली होते. राज्यपालांसारख्या व्यक्तीकडून असं झालं तर त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही मग घटना वाकवण्याचा अधिकार मिळाल्यासारखं वाटतं. एखादा निर्णय घेण्यासाठी घटनेने कालमर्यादा घातली नसेल तर त्याचा गैरअर्थ घेणं कुठल्याही व्यवस्थेला परवडणारं नाही. आमदार निवडीचा विषय तर या साऱ्या जबाबदारीहून कितीतरी मोठा आहे. निश्चित केलेल्या कोणत्याही संवर्गातील व्यक्तीची निवड रोखणं याचा अर्थ त्या गटातील नागरिकांवर अन्याय करण्यासारखं आहे. घटनेची निर्मिती आणि असलेल्या घटनेत सुधारणा करण्याची क्रिया ही समाजाची म्हणजे देशाची प्रगती आणि उन्नतीचं लक्ष्य डोळ्यापुढे ठेवून होत असते. पण सार्वजनिक हिताहून स्वहिताच्या कारणास्तव गैरफायदा घेणं हे कोणालाच अपेक्षित नाही. राज्यपाल कोश्यारींचं कृत्य त्याच पठडीत मोडणारं असल्याचं न्यायालयाच्या एकूणच फटकाऱ्यातून दिसून येतं.

## ३४.५६ लाखांना गंडा... 

(पान १ वरुन)

तिने सांगितले. त्यामुळे बँकेच्या अधिकाऱ्यांनी मिनाक्षी भोईटे हिने तारण ठेवलेल्या सोन्याचे दुसऱ्या सोनाराकडून तपासणी केली असता, ते बनावट असल्याचे आढळून आले. त्यानंतर सोनार अमृते याने सोन्याचे मुल्यांकन करुन दिलेल्या इतर काही खातेदारांवर बँकेच्या अधिकाऱ्यांना संशय आल्याने त्यांनी अरविंद अमृते याने सोन्याचे मुल्यांकन केलेल्या आणि कर्ज भरत नसलेल्या खातेदारांची माहिती काढली.

त्यानंतर सदर ग्राहकांनी तारण ठेवलेल्या सोन्याची दुसऱ्या सोनाराकडून तपासणी करुन घेतली असता ते सोने देखील बनावट असल्याचे आढळून आले. अशा पध्दतीने पाच ग्राहकांनी बँकेच्या अधिकृत सोनारासोबत संगनमत करुन बँकेत १ किलो १९९ ग्रॅम ४०० मिलीग्रॅम बनावट सोने तारण ठेवून त्याबदल्यात एकूण ३ ४ लाख ५६ हजार रुपयांचे कर्ज घेऊन बँकेची फसवणूक केल्याचे आढळून आल्याने बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश कोरडे यांनी सदर सर्वांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे.

दरम्यान, मिनाक्षी भोईटे या महिलेने २९९ ग्रॅम ६५० मिलीग्रॅम बनावट सोने तारण ठेवून त्यावर बँकेकडून ९ लाख ९० हजार रुपये कर्ज घेतले आहे. शफी अजीम पटेल याने १८९ ग्रॅम ३०० मिली बनावट सोने तारण ठेवून ५ लाख १ हजार रुपये कर्ज घेतले आहे. शफी पटेल याची पत्नी शगुप्ता पटेल हिने १२३ ग्रॅम ३०० मिली बनावट सोने तारण ठेवून सव्वा तीन लाखांचे कर्ज घेतले आहे. तसेच वैभव रमाकांत गिरधर याने २५६ ग्रॅम ५५० मिली बनावट सोने तारण ठेवून ६ लाख ३८ हजार रुपयांचे कर्ज घेतले आहे. त्याचप्रमाणे सचिन रमेश पगडे याने ३३० ग्रॅम ६०० मिली बनावट सोने तारण ठेवून १० लाख २ हजार रुपयांचे कर्ज घेतल्याचे आढळून आले आहे.

## पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ... 

(पान १ वरुन)

नवनिर्माण'च्या वतीने महापालिकेला पत्रव्यवहार करुन पाणपोई बसविण्याची मागणी करण्यात आली आहे.

नवी मुंबई महापालिका 'स्वच्छ सर्वेक्षण'च्या नावाखाली विविध कामे करत आहे. परंतु, महत्वाच्या नागरी सुविधा पुरविण्याचा विसर महापलिका प्रशासनास पडला असल्याचे विदारक चित्र पहावयास मिळत आहे. कोव्हीड कालावधीनंतर सर्वसामान्य नागरिक आता कुठे घराबाहेर पडून मोकळा श्वास घेत आहे. घणसोली परिसरात आज जेष्ठ नागरिक, महिला, तरुणवर्ग, लहान मुले यांना फेरफटका मारण्यास एकही मुबलक आणि चांगले उद्यान उपलब्ध नाही. त्यामुळे घणसोलीकर नागरिक मोठ्या प्रमाणात सप्ताह अखेरीस, सुट्टीच्या दिवशी आपल्या कुटुंबासमवेत घणसोली 'सेंट्रल पार्क'ला फिरावयास जातात. 'सेंट्रल पार्क'मध्ये इतर दिवशी नागरिकांची सकाळ आणि संध्याकाळच्या वेळेस जॉगिंगकरिता वर्दळ असते.

सदर सर्व बाबी लक्षात घेता 'सेंट्रल पार्क' उद्यानात नागरी सुविधेच्या अनुषंगाने पाणपोई असणे गरजेचे आहे, असे 'मनसे'तर्फे महापालिकेचे घणसोली विभाग सहाय्यक आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महापालिकेच्या भोंगळ कारभारमुळे आजपर्यंत नागरिकांकरिता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था महापालिका अजुनही करु शकलेली नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाने सेंट्रल पार्क उद्यानात येत्या सात-आठ दिवसांच्या आत पाणपोईची सुविधा उपलव्य करुन द्यावी. अन्यथा मनसे सदर प्रश्न आंदोलनाच्या माध्यमातून निकाली काढेल, असा इशाराही 'मनसे'तर्फे सदर निवेदनाद्वारे महापालिकेला देण्यात आला आहे.

याप्रसंगी घणसोली सहाय्यक आयुक्तांना निवेदन देत असताना 'मनसे'चे घणसोली विभाग अध्यक्ष विशाल चव्हाण, उपविभाग अध्यक्ष श्याम वाघमारे, शाखा अध्यक्ष अक्षय नाईक, देवानंद खिलारी, निलेश जाधव, दिनेश इंगळे, उपशहर संघटक महेंद्र पारवे, प्रभाग संघटक हरीश चव्हाण, उपप्रभाग संघटक धनंजय देवकर आणि मराठी कामगार सेनेचे आशिष चोरगे उपस्थित होते.

# महात्मा फुले कॉलेजमध्ये पदवीदान समारंभ संपन्न



**पनवेल** : 'रयत शिक्षण संस्था'च्या महात्मा फुले कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालयामध्ये पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. १२ मार्च रोजी झालेल्या सदर समारंभास 'रयत शिक्षण संस्था'चे व्यवस्थापन समिती सदस्य तथा महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष माजी खासदार रामशेठ ठाकूर आणि 'भारती विद्यापीठ'चे कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील पदवीधर आणि पदव्युत्तर स्नातकांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.

उत्साहपूर्ण वातावरणामध्ये संपन्न झालेल्या सोहंळ्याच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी उपस्थितांचे स्वागत केले व आपले मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमात पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतानाव आदर्श नागरिक म्हणून जीवन कसे जगता येईल यासाठी प्रयत्न करा. इतर गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याचे आवाहन करीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिक्षणाचे महत्व विषद केले.

शिक्षणातून मिळणाऱ्या जीवन मूल्यांचा यथायोग्य वापर प्रत्यक्ष जीवनामध्ये करणे आवश्यक आहे. जीवनामध्ये येणाऱ्या अडचणींवर मात करुन पुढे जाणे महत्वाचे आहे. २१ व्या शतकातील आवाहने, जागतिकीकरण या सारख्या गोष्टींना आजच्या विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी सक्षम राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन 'भारती विद्यापीठ'चे कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे यांनी यावेळी केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एन. आर. मढवी, डॉ. आर. ए. पाटील, उपप्राचार्य ए. जी. रोकडे तसेच विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पदवीदान समारंभात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी प्रास्ताविक केले. तर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर. ए. पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, प्राध्यापिका सोनू तन्वार आणि प्रा. प्रवीण गायकर यांनी केले.

# ७७ वे मधुबन कविसंमेलन संपन्न

**उरण** : कोकण मराठी साहित्य परिषद, मधुबन कट्टा उरणचे दरमहा १७ तारखेला होणारे होणारे कविसंमेलन ज्येष्ठ कवी रामचंद्र म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली बोकडविरा गावी संपन्न झाले.

करताना जग विनाशकारी ठरत आहे, ती व्रुत्ती जळायला हवी असे सांगितले. रामचंद्र म्हात्रेंनी होळीचा गोंधळ मांडला तर मच्छिंद्र म्हात्रे यांनी आयनंचे भयनं या जुन्या आगरी गाण्याची मजेशीर आठवण लोभस ठरली.



होळीचा दिवस असल्याने सम्मेलनात होळीचा आनंद देणाऱ्या कविता गाऊन सादर केल्या. लोकशाहीर मोरेश्वर म्हात्रे यांची दोन फटकाबध्द गाणी होळीचा जोश चढविणारी ठरली. भगवान पोसू यांनी वाईट विचारांना जाळू या, आपल्या कवितेतून स्पष्ट

यावेळी रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील, सुजन सींग, नामदेव बरतोड, वसंत राऊत आदिंच्या कविता छान झाल्या. रसिकांना होळीचा आनंद कवितांमधून घेता आला. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन मच्छिंद्र म्हात्रे यांनी केले.

# गुरुवर्य बाळाराम पाटील यांचे निधन; आज शोकसभा



**नवी मुंबई** : ज्येष्ठ समाजसेवक आणि भाजपचे माजी नगरसेवक सुनील बाळाराम पाटील यांचे वडील गुरुवर्य बाळाराम उत्तमराम पाटील यांचे नुकतेच वृद्धापकाळाने रुग्णालयात निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते.

गुरुवार्य बाळाराम पाटील हे दारावे गावातील विद्यावर्धिनी संस्था आणि खारी कळवा शेतकरी समाज संघटना ग्रामस्थ यांच्याशी अनेक वर्षांपासून संबंधित होते. पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी २० मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

नवे शहर
आपली फिर्याद
9867529918
9867529920
तुमच्या परिसरात, कार्यालयाच्या ठिकाणी, प्रवासादम्यान अनेक गैरसोयी, नागरी समस्यांना तुम्ही सामोरे जात असला. या समस्या उजेडात आणण्यासाठी 'नवे शहर'ने 'आपली फिर्याद' व्यासपीठ खुले केले आहे.
या स्तंभाच्या माध्यमातून तुम्ही आमच्याकडे तुमच्या तक्रारी WhatsApp च्या माध्यमातून मांडू शकता.
contact@naveshahar.com

## जाहीर नोटीस

या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मौजे–घोट, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड येथील (1) गट क्रमांक व उपविभाग–52/4, क्षेत्र 0–18–00 हे. आर. पी. आणि (2) गट क्रमांक व उपविभाग – 54/6, क्षेत्र 0–29–30 हे. आर. पी., पोटखराबा 0–01–00 हे. आर. पी., क्षेत्राची जमीन मुळ मालक, श्री प्रकाश अनंत निघुकर यांच्या मालकीची असून, सदर जमीन मिळकतीबाबत आमचे अशिल हे मुळ मालक यांच्याबरोबर खरेदी–विक्रीचा व्यवहार करण्यास इच्छुक आहेतसदर वर वर्णन केलेल्या भुखंड मिळकतीवर जर कोणाचा विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट, जप्ती, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा असा हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 15 (पंधरा) दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांनिशी पूराव्यासह लेखी हरकत माझ्या कार्यालयीन पत्ता–406, शेल्टन क्युबिक्स, भूखंड क्रमांक–87, सेक्टर क्रमांक–15, सी.बी.डी., बेलापुर, नवी मुंबई–400 614, या पत्त्यावर पाठवावी, जर 15 (पंधरा) दिवसांच्या आत कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर भूखंड मिळकत ही पूर्णपणे निर्वेध आहे, असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल हे सदर मिळकतीबाबतचा खरेदी –विक्रीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी

दिनांक : 20/03/2022

सही/–
वीणा कुलकर्णी,
वकील

## जाहीर नोटीस

माझ्या अशिलाच्या वतीने सर्व जनतेस या नोटीसद्वारे असे सुचित करण्यात येते की माझे अशिल **सौ. रतनदेवी गौतम जैन** यांनी सदर भुखंडाचे मालक **श्री. संदेश अनंत कोळी, रा. कोबंडभुजे, पोष्ट - उलवे, ता. पनवेल, जि. रायगड** यांच्या मालकीचा पुर्नवसन व पुनःस्थापना योजने अंतर्गत पुष्पक वहाळ येथील भुखंड क्र. २५८, सेक्टर-२५, क्षेत्रफळ ५० चौ.मी., ता. पनवेल, जि. रायगड या भुखंडाचे सर्व हक्क अधिकार व फायदा कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**भुखंडाचा तपशिल**

| भुखंड क्र. | क्षेत्रफळ | सेक्टर | ठिकाण | मंजुर एफएसआय |
|---|---|---|---|---|
| २५८ | ५०.०० | २५ | पुष्पक वहाळ | १.५ |

तरिही याबाबत कोणाही व्यक्ती/व्यक्तींचे किंवा आर्थिक संस्थाचे वरील भुखंडासंबंधी कुठल्याही प्रकारचा दावा, हरकती, जसे विक्री, गहाण, ताबा, जबाबदारी, बक्षिस, भेट, भाडेपट्टा, वारसाहक्क, कर्ज असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत या भुखंडाच्या संबंधातील दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रतीसह माझ्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा सदर भुखंडाच्या हस्तांतर बाबतची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही. कृपया यांची नोंद घ्यावी.

सही/-
दिनांक : २०/०३/२०२२
स्थळ : नवी मुंबई.
**राजेश मधुसुदन नेवगी**
बीकॉम., एलएल.बी. ॲडव्होकेट हायकोर्ट
ऑफिस : ९९, प्लॉट नं. १, सेक्टर-११,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
मो. : ९३२२३२७४००

## नवी मुंबई महानगरपालिका

**परिमंडळ-2 विभाग**

**निविदा सुचना क्र. नमुंमपा/ का.अ. (घणसोली)/ 118 /2021-2022**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | स्वच्छ भारत अभियान अतर्गत घणसोली विभागातील सावली गांव शौ., से.-6 से.4 व आवश्यक ठिकाणी येथील शौचालयाच्या आजुबाजुच्या परिसरातील भिंतीवर 3D/ 2D पेंटींग करणे. | 2,40,763/- |
| 2 | स्वच्छ भारत अभियान अतर्गत घणसोली विभागातील से.11 साईबाबा मंदिर जवळील सार्वजनिक शौचालय परिसरात सुधारणा करणे. | 2,22,633/- |
| 3 | स्वच्छ भारत अभियान अतर्गत घणसोली विभागातील सिताराम वाडी, से.25, नोसिल नाका, सम्राटनगर, मातंगवाडी येथील शौचालयाच्या आजुबाजुच्या परिसरातील भिंतीवर 3D/ 2D पेंटींग करणे. | 2,40,763/- |
| 4 | स्वच्छ भारत अभियान अतर्गत घणसोली गुणाली तलाव, चिंचआळी, गावंदेवीवाडी, जिजामाता नगर येथील शौचालयाच्या आजुबाजुच्या परिसरातील भिंतीवर 3D/ 2D पेंटींग करणे | 2,22,420/- |
| 5 | स्वच्छ भारत अभियान अतर्गत घणसोली विभागातील कौल आळी, कोल्यांची आळी, तळवली गांव, बाळाराम वाडी येथील येथील शौचालयाच्या आजुबाजुच्या परिसरातील भिंतीवर 3D/ 2D पेंटींग करणे | 2,31,495/- |

**मोहरबंद संपुर्ण निविदा दि. 28 /03 /2022 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यत नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, आवक जावक कक्षए तळ मजला प्लॉट नं.1 व 2, गोवधर्नी चौक ए से.15 ए सी.बी. डी. बेलापूर, नवी मुंबई येथील पेटीत टाकण्यात याव्यात.**

सही/-
**कार्यकारी अभियंता (घणसोली)**
**नवी मुंबई महानगरपालिका**
जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/1552/2022

# खारघर आगीची चौकशी करुन गुन्हा दाखल करण्याची मागणी

## शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांचे पोलिसांना निवेदन



**पनवेल** : खारघर मधील डोंगरावर लागलेल्या आगीसंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधितांवर गुन्हा दाखल करावा. तसेच पर्यावरणाचा विध्वंस करुन खारघर डोंगरावरील वनसंपदा, पक्षी, प्राणी यांना आगीत भस्मसात करणाऱ्यांवर कायदेशीर आणि कायमस्वरूपी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी खारघर पोलिसांकडे केली आहे.

दोन दिवसांपूर्वी खारघर मधील डोंगरावर मोठ्या स्वरुपात आग लागली. या आगीत मोठ्या प्रमाणावर डोंगरावर राहणारे पशुपक्षी, प्राणी होरपळून मृत्युमुखी पडले. दरवर्षी खारघर डोंगरावर काही अज्ञात आणि अपप्रवृत्तीच्या व्यक्तींकडून आग लावण्यात येते. त्यानंतर बेसुमार वृक्षतोड करण्यात येते. स्थानिक वन अधिकारी याला जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. खारघरमध्ये लागलेली आग पूर्वनियोजित असावी. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाच्या गाड्या आणि मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ लागले. तरीही आग आटोक्यात आलेली नव्हती. त्यामुळे या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन गुन्हा दाखल करावा, अशी मागणी जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी खारघर पोलिसांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# आकुर्ली येथे पोपटी संमेलन संपन्न



**पनवेल** : वालाच्या शेंगांची विशिष्ट पध्दतीने तयार करण्यात आलेली चविष्ट पोपटी आणि राज्याच्या कानाकोपऱ्यातून उत्स्फुर्तपणे सामिल झालेले कवी, शाहीर यांनी 'स्वाद पोपटीचा, आस्वाद कवितेचा' असा आगळा-वेगळा कार्यक्रम अजरामर केला. विशेष म्हणजे पारंपरिक पध्दतीच्या पोपटी संमेलनाला छेद देत आलिशान वातानुकुलित, रंगबेरंगी विद्युत रोषणाईची शाल पांघरलेल्या लख्ख प्रकाशाच्या सभागृहात सदर मैफिल सजली होती. त्यामुळे पोपटीचा स्वाद आणि कवितेच्या कैफाने अवघा रंग एक झाला होता.

कांतीलाल प्रतिष्ठान आणि पनवेल संघर्ष समिती तर्फे ज्येष्ठ साहित्यिक तथा समीक्षक ॲड. विलास नाईक यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे पोपटी कवी संमेलन काकाजीनी वाडी, आकुर्ली येथे आयोजित केले होते. याप्रसंगी महाराष्ट्राचे लाडके कवी, गीतकार तथा ज्येष्ठ साहित्यिक प्रा.अशोक बागवे, आयुर्वेदाचार्य डॉ.भक्तीकुमार दवे आणि चित्रपट निर्माते राम मलिक यांची प्रमुख उपस्थिती होती.

या संमेलनात संजीव कोकील, अशोक भांडवलकर, विशाल उशिरे, गुणवंत पाटील, जोत्स्ना राजपूत, सुनिता रामचंद्र, सोमनाथ चव्हाण (महाराष्ट्र पोलीस), पोलीस उपनिरीक्षक प्रवीण फणसे आणि कुटुंबीय, श्रध्दा खानविलकर, वैभव वरडी, शांताराम लोखंडे, उमेश जाधव, जितेंद्र लालड, अमोल म्हात्रे, सौरभ साळुंखे, रंजना केणी यांनी सहभाग घेवून नव्या क्षितीजावर कवितेची मोहोर उमटवली.

प्रारंभी ॲड.विलास नाईक, प्रा.अशोक बागवे, डॉ.भक्तीकुमार दवे, कांतीलाल कडू यांची कवितेला समर्पित भाषणे झाली. शेरो शायरीची उधळण करत डॉ. राजेंद्र राठोड यांनी ठसकेबाज शैलीत सूत्रसंचालन केले.

# आज नवीन पनवेलमध्ये हळदी कुंकू, चला खेळ खेळूया पैठणीचा कार्यक्रम

**पनवेल** : जागतिक महिला दिनानिमित्त तालुका-शहर मंडल भाजपा महिला मोर्चा वतीने आज २० मार्च रोजी नवीन पनवेल येथे हळदी कुंकू समारंभ आणि चला खेळ खेळूया पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

नवीन पनवेल मधील श्री. संत साईबाबा शाळा येथे होणाऱ्या या समारंभास प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेत्या शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, महिला मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षा अश्विनी पाटील, उपमहापौर सीता पाटील, महिला मोर्चाच्या प्रदेश सदस्या दर्शना भोईर, महिला-बाल कल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, अ-प्रभाग समिती सभापती संजना कदम, ब-प्रभाग समिती सभापती प्रमिला पाटील, क-प्रभाग समिती सभापती अरुणा भगत, ड-प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, जिल्हा परिषद सदस्या रेश्मा शेळके, पंचायत समिती सदस्या रेखा म्हात्रे, तनुजा टेंबे, यांच्यासह आजी-माजी नगरसेविका, पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच उपस्थित राहणार आहेत.

सदर कार्यक्रमाचा महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्षा वर्षा नाईक यांनी केले आहे.

# 'द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल'ने केला १९ हजार पेक्षा जास्त किलोमीटरचा प्रवास



**पनवेल** : 'द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल'ने १ डिसेंबर २०२१ पासून ११ मार्च २०२२ पर्यंत देशातील सर्व राज्यांचा समावेश करुन १९ हजार पेक्षा जास्त किलोमीटरचा प्रवास केला असून नुकताच या प्रवासाचा समारोप खारघर येथे पार पडला. याप्रसंगी 'भाजपा'चे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील,

## आ.प्रशांत ठाकूर यांच्याकडून कौतुक

अनिता पाटील, नेत्रा पाटील, माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, जिल्हा चिटणीस गीता चौधरी आदि उपस्थित होते.

द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल १०१ दिवसांची रोड ट्रिप मोहीम होती. जी कोव्हीडमुळे प्रभावित झालेल्या लहान आणि सूक्ष्म व्यवसायांना मदत करण्यासाठी, सर्व भारतीय राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांमध्ये, भारत आणि भारताची संस्कृती, परंपरा, रितीरिवाज, पाककृती अशा विविध बाबतीत प्रेरक ठरली. सदर मोहिमेदरम्यान रोटरी क्लब, रोटरॅक्ट क्लब, एनजीओ क्षेत्र आणि स्टार्ट अप्स आणि लहान व्यावसायिक समुदायांसारख्या विविध आंतरराष्ट्रीय संस्थांमधील ८०० पेक्षा जास्त समविचारी लोकांच्या भेटी झाल्या.

## कोकण रेल्वे... (पान १ वरुन)

चिपळूण, खेड, वीर, माणगांव आणि रोहा स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे.

तर गाडी क्रमांक ०१२०१ नागपूर-मडगांव ९ एप्रिल ते ११ जून या कालावधीत प्रत्येक शनिवारी दुपारी ३.५० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सायंकाळी ५.३० वाजता मडगांव येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०१२०२ मडगांव-नागपूर विशेष गाडी १० एप्रिल ते १२ जून या कालावधीत प्रत्येक रविवारी रात्री ८.१५ वाजता मडगांव येथून सुटून दुसऱ्या दिवशी रात्री ८.१० मिनिटांनी नागपूरला पोहोचेल. या गाडीला वर्धा जंक्शन, धामणगांव, बडनेरा जंक्शन, अंकोला, मलकापूर, भुसावळ जंक्शन, मनमाड जंक्शन, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, पनवेल, रोहा, माणगांव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, राजापूर रोड, वैभववाडी रोड, थिवीम आणि करमाळी येथे थांबा देण्यात आला आहे.

## पत्नीची हत्या...

(पान १ वरुन)

पत्नी बारकु सोबत नेहमी भांडण करत होता. १७ मार्च रोजी होळीच्या रात्री १०.३० वाजता दिपक आणि बारकु यांच्यात त्याच कारणावरुन भांडण झाले.

यावेळी शेजारी राहणाऱ्या कुटुंबाने त्यांच्यातील भांडण सोडवून ते आपल्या घरी निघून गेले. मात्र, त्यानंतर पुन्हा त्यांच्यातील भांडण विकोपाला गेल्यानंतर दिपकने आपली पत्नी बारकु हिला विटेने मारहाण करुन तिची हत्या केली. त्यामुळे त्यांच्या मुलीने रडत-रडत शेजाऱ्यांकडे जाऊन सदरचा प्रकार सांगितला. यानंतर शेजाऱ्यांनी जाऊन पहाणी केली असता, झोपडीमध्ये बारकु मृतावस्थेत आढळून आली. त्यानंतर त्यांनी पनवेल तालुका पोलिसांना याबाबतची माहिती दिली. यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन बारकुचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. त्यानंतर पोलिसांनी पळून गेलेल्या दिपक विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करुन त्याला दुसऱ्या दिवशी अटक केली.

## खाजगी कंपनीच्या... (पान १ वरुन)

असावा, असे समजुन सुरेश यांनी सदर व्हॉटस्ॲपवरुन चॅटींग करण्यास सुरुवात केली.

यावेळी सायबर चोरट्याने कंपनीच्या चेअरमन असल्याचे तसेच त्या मिटींगमध्ये व्यस्त असल्याचे भासवून सुरेश यांच्यासोबत चॅटींग करुन त्यांना प्रत्येकी १० हजार रुपये किंमतीचे ५ ॲमेझॉन पे गिफ्ट कार्ड ॲमेझॉन साईटवरुन खरेदी करुन त्यांच्याकडून देण्यात येणारी लिंक पाठविण्यास सांगितले. त्यामुळे सुरेश यांनी तत्काळ ५ ॲमेझॉन पे गिफ्ट खरेदी करुन ते सायबर चोरट्याच्या व्हॉटस्ॲपवर पाठवून दिल्या. काही वेळानंतर सायबर चोरट्याने आणखी १५ ॲमेझॉन पे गिफ्ट कार्ड पाठविण्यास सांगितले. त्या देखील सुरेश यांनी पाठवून दिल्या. अशा पध्दतीने ठकसेनाने सुरेश यांना आणखी पे गिफ्ट पाठविण्यास सांगितल्याने सुरेश यांनी आपली पत्नी, आई आणि इतर मित्रांकडून पैसे घेऊन एकूण ४५ पे गिफ्ट कार्डची खरेदी करुन त्या सायबर चोरट्याला पाठवुन दिल्या.

मात्र, त्यानंतर देखील समोरुन आणखी पे गिफ्टची मागणी करण्यात येऊ लागल्याने सुरेश यांना संशय आला. त्यामुळे त्यांनी चेअरमनसह असलेल्या इतर अधिकाऱ्यांशी संपर्क साधल्यानंतर चेअरमन मिटींगमध्ये नसल्याचे तसेच त्यांनी कुठल्याही प्रकारचे पे गिफ्ट कार्ड मागविले नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे सुरेश यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी तत्काळ ॲमेझॉन वर संपर्क साधून त्यांनी विकत घेतलेले सर्व गिफ्ट कार्डस् ब्लॉक करण्यास सांगितले. मात्र, तोपर्यंत सायबर चोरट्याने त्यातील २५ पे गिफ्ट कार्डचा वापर केल्याने ॲमेझॉनला फक्त २० कार्ड ब्लॉक करता आले. त्यानंतर सुरेश यांनी सानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## आ.मंदाताई म्हात्रे ...

(पान १ वरुन)

राय, जगन्नाथ जगताप, ए. व्ही. नायर, शशी नायर, कल्पना शिंदे, भास्कर यमगर तसेच 'भाजपा'चे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजपा महिला मोर्चा आणि उत्तर भारतीय मोर्चा यांच्यातर्फे जो सन्मान करण्यात आला, त्यामुळे यापुढील जबाबदारी आणखी वाढली आहे. यापुढे सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा तसेच चांगली सेवा देण्याचा प्रयत्न राहणार आहे. महाराष्ट्र भवन निर्मिती करण्याचा अनेक वर्षांपासूनचा प्रलंबित प्रश्न, त्यासाठी राज्य शासनाकडे सातत्याने मागणी केली होती. आता 'महाराष्ट्र भवन'च्या भूखंडावर ज्या दिवशी भूमीपुजन होईल, त्या दिवशी या प्रयत्नांचे सार्थक झाले असे समजेन, असे आमदार सौ. मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले.

शासन दरबारी केवळ पत्रव्यवहार करुन चालत नाही तर त्याबाबतचा सतत पाठपुरावा करावा लागतो. ते संपूर्ण काम पूर्णत्वास होईपर्यंत त्याबाबत पाठलाग करावा लागतो. बेलापूर मतदारसंघातील नागरिकांनी माझ्यावर जो विश्वास दाखविला आहे, तो विश्वास सार्थक करण्यासाठी मी सतत काम करीत आहे. त्यामुळे मी विरोधी पक्षातील असूनही सरकारला माझ्याा कामांची दखल घ्यावीशी वाटते. तसेच नवी मुंबईतील विविध प्रकल्प उभारण्यासाठी नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांजकडे १००० कोटी रुपयांच्या तरतुदींची मागणी केली होती. ते प्रकल्पही लवकरच उदयास येतील, असा विश्वासही आ. सौ. मंदाताई म्हात्रे यांनी यावेळी व्यक्त केला.

दरम्यान, नवी मुंबईतील 'भाजपा'चे पदाधिकारी-कार्यकते, युवा मोर्चा आणि महिला मोर्चा या सर्वांच्या सहकार्यामुळेच सदर सर्व शक्य झाले असल्याचे मत आमदार सौ. मंदाताई म्हात्रे यांनी व्यक्त केले.

॥ श्री. गणेशाय नमः ॥
मो : 9833237011
जुने कपडे विकत घेणार
आमचा येथे जुने पॅन्ट, शर्ट, साडी, पंजाबीड्रेस, जरीची साडी, विकत पैशाने घेतले जातील.
तुरंत कॅश
अजय जुने कपडे वाला
वेळ : दुपारी २.०० ते ८.०० शुक्रवार बंद

# कोपरी गाव गांवदेवी मंदिराचा आज जीर्णोध्दार



**वाशी** : कोपरी गाव ग्रामस्थांनी लोकसहभागातून गावदेवी मंदिराचे नूतनीकरण केले आहे. गावदेवी मातेची प्राणप्रतिष्ठापना आणि मंदिराचा जीर्णोध्दार सोहळा आज २० मार्च रोजी परमपूज्य बालयोगी श्री योगेशजी बुवा रामदासी यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. त्यापार्श्वभूमीवर १६ मार्च रोजी गावदेवी मातेचा भव्य मिरवणूक आगमन सोहळा आयोजित करण्यात आला होता.

प्रत्येक गाबत ग्रामदेवता असते आणि त्यांची आख्यायिका असते. कोपरी गाव गावदेवीची देखील आख्यायिका आहे. कोपरी गावाच्या मध्यभागी गावदेवीचे मंदिर आहे. या देवीला सुमारे २०० वर्षापेक्षा जास्त वर्ष झाल्याचे गावातील ज्येष्ठ नागरिक सांगतात. सुरुवातीला गावदेवीचे एक छोटासे गोलाकार मंदिर होते. ग्रामस्थ त्यास 'मठी'म्हणत. कालांतराने कोपरी गावात गांवदेवीचे कौलारु मंदिर बांधण्यात आले. तेव्हा पासून मंदिरात गांवदेवीची (फक्त मानेपर्यंत चेहरा) पंचधातूची मूर्ती होती. गोविंद ठाकूर (ज्ञात असल्याप्रमाणे) गांवदेवीचे भगत होते. त्यांच्या निधनानंतर काथोड कमळ्या भोईर, धाकल्या नारायण ठाकूर, बाळाराम सीताराम ठाकूर आणि सुमन भोईर आदि देवीचे भगत होऊन गेले. तर सुमन बबन ठाकूर या अजून हयात आहेत.

कोपरी ग्रामस्थांनी लोक सहभागातून १६ वर्षापूर्वी नवीन मंदिर बनविले. नवीन मंदिर बनविले तरी मूर्ती मुखवट्याचीच होती. त्यानंतर पुन्हा २००८ साली मंदिराचे काम करुन मंदिरात देवीच्या पूर्णाकृती मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. मात्र, मंदिराला पाण्याची गळती लागल्याने २०२० मध्ये ग्रामस्थ मंडळाने लोकसहभागातून मंदिराचे नुतनीकरण करण्याचा निर्णय घेऊन मंदिराचे काम पूर्ण केले. त्यामुळे मंदिरात पुन्हा नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. त्या धर्तीवर गांवदेवीची नवीन मूर्ती आणण्यात आली.

मूर्तीचा आगमन सोहळा १६ मार्च रोजी आयोजित करण्यात आला होता. या आगमन सोहळ्यात सर्व ग्रामस्थांनी सहभाग घेतला होता. आज २० मार्च रोजी गांवदेवीची मातेची प्राणप्रतिष्ठापना आणि मंदिर जीर्णोध्दार सोहळा परमपूज्य बालयोगी श्री योगेशजी बुवा रामदासी यांच्या हस्ते संपन्न होणार आहे, अशी माहिती कोपरी गाव ग्रामस्थ मंडळ तर्फे देण्यात आली.

# रबाले गावात २०० नागरिकांना ई-श्रम कार्ड वाटप

**नवी मुंबई** : ऐरोलीतील 'विश्वास बहुउद्देशीय विकास संस्था'च्या वतीने रबाले गाव येथे आयोजित करण्यात आलेल्या ई-श्रम कार्ड शिबिरामध्ये २०० नागरिकांना ई-श्रम कार्डचे वाटप करण्यात आले. गत महिन्याभरामध्ये 'विश्वास बहुउद्देशीय विकास संस्था'तर्फे रबाले गांव, ऐरोली सेक्टर-४ भागात ई-श्रम कार्डचे चार शिबीर घेण्यात आले असून ३५० नागरिकांना ई-श्रम कार्डचे वाटप करण्यात आले आहे.

महिलांसाठी रोजगार, स्वंयरोजगार तसेच आरोग्याविषयी काम करणाऱ्या ऐरोलीतील 'विश्वास बहुउद्देशीय विकास संस्था'च्या वतीने ई-श्रम कार्ड शिबिरांच्या माध्यमातून रिक्षा चालक, पेंटर, भाजी विक्रेते, फळ विक्रेते तसेच मच्छी विक्रेत्यांना ई-श्रम कार्डचे वाटप करण्यात येत आहे. १३ मार्च रोजी संस्थेच्या वतीने रबाले गावात आयोजित शिबीरामध्ये २०० नागरिकांना ई-श्रम कार्डचे वाटप करण्यात आले.

यापसंगी 'विश्वास बहुउद्देशीय विकास संस्था'च्या अध्यक्षा यल्लवा रसनभैरे, माधवी परदेशी, पुनम कदम, कमलताई पाटील आणि इतर प्रमुख कार्यकर्त्या उपस्थित होत्या. संस्थेच्या वतीने नुकतीच श्रमिक, कष्टकऱ्यांची तसेच विविध प्रकारची कामे करणाऱ्या नागरिकांची नोंदणी करण्यात आली होती. त्यानंतर ई-श्रम कार्डचे वाटप करण्यात आले. दरम्यान, यापूर्वी 'विश्वास बहुउद्देशीय विकास संस्था'ने ऐरोली सेक्टर-४ मध्ये दोन तर रबाले गावात-१ शिबीर राबवून १५० नागरिकांना ई-श्रम कार्डचे वाटप केले आहे. या शिबीरामध्ये परिसरातील विविध प्रकारची कामे करणाऱ्या महिला आणि पुरुषांनी उत्स्पुर्तपणे सहभाग घेतला.

# नवी मुंबईतील पत्रकारांची किल्ले प्रतापगडास भेट



**नवी मुंबई** : जर्नालिस्ट वेलफेअर असोसिएशन, नवी मुंबईच्या वतीने एक दिवस गड-किल्ल्यांसाठी, आपला इतिहास जोपासण्यासाठी या उपक्रमांतर्गत पत्रकारांची किल्ले भेट आणि पुरातन धार्मिक स्थळांच्या दोन दिवसीय भेटीचे नुकताच आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे शौर्य आणि त्यांच्या पराक्रमाची यशोगाथा सांगणाऱ्या प्रतापगडाला भेट, पुरातन श्रीक्षेत्र महाबळेश्वर, पंचगंगा देवस्थान, पाचगणी येथील भिलार गावातील देशातील पहिलं अनोख्या पुस्तकांचे गाव आदि ठिकाणे या दरम्यान पत्रकारांना पाहता आली. किल्ले प्रतापगडाचा पराक्रमी इतिहास, सह्याद्रीच्या डोंगररांगाची अभ्यासपूर्ण माहिती आनंद उतेकर यांनी विशद केली.

जर्नालिस्ट वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार अशोक शेशवरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित दोन दिवसीय अभ्यास दौयात जेष्ठ पत्रकार विश्वरथ नायर यांनी मार्गदर्शन केले. सदर दौऱ्याची सुरुवात सीबीडी येथून होताना नैना बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश बाविस्कर, माजी नगरसेवक अशोक गुरखे यांनी भगवा ध्वज फडकावत शुभेच्छा दिल्या. पाचगणी भिलार प्रमाणे स्वच्छ सुंदर शहर म्हणून ओळखला जाणाऱ्या नवी मुंबई शहरात नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून प्रायोगिक तत्त्वावर पुस्तकांचे नवी मुंबई शहर निर्माण करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे शेशवरे यांनी सांगितले. या अभ्यास दौऱ्यास महाबळेश्वर येथील प्रसिद्ध बिल्डर रमेश ढेबे, भगवान ढेबे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# रश्मी हेडे यांना राज्यस्तरीय साहित्यसेवक पुरस्कार



**नवी मुंबई** : गुणिजणगौरव लोकसेवा अकादमीचा नारीशक्ती राज्यस्तरीय आदर्श साहित्यसेवक भाषागौरव पुरस्कार-२०२२ सुप्रसिद्ध साहित्यिक रमेश आव्हाड आणि सुप्रसिद्ध विचारवंत श्यामसुंदर महाराज सोन्नर आळंदीकर यांच्या हस्ते सौ. रश्मी उल्हास हेडे यांना नुकताच प्रदान करण्यात आला.

सौ. रश्मी हेडे या गेली ८ वर्षे विविध विषयांवर लेखन करीत आहेत. कोरोनाच्या काळात सर्व कामकाज ठप्प झाल्याने विविध वृत्तपत्रे व वेबपोर्टलवर त्या सतत जागृतीपर, प्रेरणादायी लिखाण करीत आहेत. जवळपास १२० लेख त्यांनी लिहिले असून या लिखाणाबद्दल आतापर्यंत त्यांना सत्यवादी ह्यूमन राईट्स-मुंबई, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक अँड फिजिकल हेल्थ सायन्सेस- नवी दिल्ली, भारतीय महाक्रांती सेना, अखिल भारतीय पत्रकार संघाचा स्वयंसिद्ध राष्ट्रीय पुरस्कार (नाशिक) तसेच संजीवन कला विकास समिती (घोडपदेव मुंबई) नवदुर्गा पुरस्कार २०२१ प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे श्रेय त्यांनी त्यांचे साहित्यिक गुरु तथा महाराष्ट्र शासनाच्या माहिती-जनसंपर्क महासंचालनालयाचे माजी संचालक देवेंद्र भुजबळ तसेच न्युज स्टोरी टुडे या वेब पोर्टलच्या सहसंपादक सौ. अलका भुजबळ यांना दिले आहे.

## 'पारसिक हिल'...

(पान १ वरुन)

अधिकाऱ्यांनाही आहे.

पारसिक हिल परिसर अतिशय नयनरम्य असून या भागाला कोणत्याही कृत्रिम सौंदर्यीकरणाची आवश्यकता नाही. वृक्षारोपण करण्याकरिता मातीचा उपसा करणे तसेच डोंगर कापून काढल्याने जमीन भुसभुशीत होऊन भूस्खलन होण्याचा धोका नाकारता येणार नाही, असे 'पारसिक रेसिडंटस् असोसिएशन'चे अध्यक्ष जयंत ठाकूर यांनी या प्रकरणाची पुष्टी करत सांगितले.

मुख्यमंत्री कार्यालय (सीएमओ) कडून वन सचिव वेणुगोपाल रेड्डी यांना याप्रकरणी लक्ष घालण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, पारसिक डोंगर भागात सुरु असलेल्या उत्खननात कोणताही सरकारी हस्तक्षेप झाला नाही. याविषयी तपास करण्याचे निर्देश ठाण्याच्या प्रमुख वन संरक्षकांना देऊन रेड्डी यांनी आपली भूमिका निभावली, अशी माहिती कुमार यांनी दिली. या प्रकरणी बी. एन. कुमार यांनी स्वत: वेळोवेळी तब्बल महिनाभर मुख्यमंत्र्यांना ई-मेल द्वारे सर्व माहिती दिली होती. आम्हाला ई-मेल व्यवहार मालिकेत पाचव्यांदा सीएमओ कडून नव्याने मेल प्राप्त झाला. या प्रकरणी शहर विकास विभागाला लक्ष घालण्यास सांगितले आहे, असे कुमार म्हणाले.

दरम्यान, 'सिडको'कडे पारसिक हिलचे नियंत्रण असल्याने बहुदा सदर प्रकार घडत असावेत. त्यावर कडी म्हणजे नियोजन करणाऱ्या 'सिडको'ने २०० प्लॉटचे वाटप केले असून त्यापैकी निम्मे व्यापलेले आहेत, असा शाब्दिक टोलाही कुमार यांनी लगावला आहे.



## १४ आरोग्यकर्मींचा सन्मान...

(पान १ वरुन)

केंद्रांच्या गटातील एएनएम सुलोचना ऐनकर तसेच आशा स्वयंसेविका मंगल दामोदर आणि सारिका डोहाळे यांना प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

नेरुळ-१, नेरुळ-२, कुकशेत, शिरवणे या नागरी आरोग्य केंद्रांच्या गटातून एएनएम मोहिनी निकुंब, आशा स्वयंसेविका विणादेवी राणा आणि रुक्मिणी तेली यांचा सन्मान झाला. तुर्भे, सानपाडा, जुहूगांव नागरी आरोग्य केंद्रांच्या गटात एएनएम वैशाली वाडकर तसेच आशा स्वंयसेविका सत्वशीला गोडबोले, लावण्या पोला या सन्मानित झाल्या.

महापे, पावणे, नोसिल नाका नागरी आरोग्य केंद्रांच्या गटामधून एएनएम पूर्वा भोकरे तर आशा स्वयंसेविका निता गायकवाड आणि पंचफुला भगत यांचा तर वाशीगांव, इंदिरानगर, खैरणे नागरी आरोग्य केंद्रांच्या गटात एएनएम कुसुम निकम, आशा स्वयंसेविका सरला ओसरमल आणि शोभा कोळमकर, कातकरीपाडा, घणसोली, इलठणपाडा या नागरी आरोग्य केंद्रांच्या गटात एएनएम सुमित्रा चौधरी, आशा स्वयंसेविका सबिता मुन्नी आणि कमल कोचेवाड तसेच दिघा, राबाडे, ऐरोली, चिंचपाडा नागरी आरोग्य केंद्रांच्या गटातून एएनएम पौर्णिमा परांजपे तर आशा स्वयंसेविका अनिता पायगुडे, रेश्मा खोपटकर यांना सन्मानित करण्यात आले.

सदर सन्मानावेळी सातही कार्यक्रमस्थळी स्थानिक कलावंतांचे सांस्कृतिक कार्यक्रम आणि छायाचित्र प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत उत्तम कामगिरी करणाऱ्या आरोग्यकर्मींचा सन्मान होत असताना लसीकरण नियंत्रक वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण तसेच ठिकठिकाणी संबंधित नागरी आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी, एएनएम, एलएचव्ही, आशा स्वयंसेविका आणि इतर कर्मचारी उत्साहाने उपस्थित होते.

## नेरुळ, जुईनगर ...

(पान १ वरुन)

केलेल्या रस्त्याची डागडुजी तात्काळ करणे महापालिका प्रशासनाचे कर्तव्य आहे. परंतु, काम झाल्यावरही खोदकाम बुजविले न गेल्याने सदर भागातील स्थानिक रहिवाशांना समस्यांचा सामना करावा लागतो. परिणामी, वाहतूक कोंडी, धुराळा आणि अन्य समस्यांचा सामना करताना रहिवाशांच्या आरोग्यावरही प्रतिकूल परिणाम होत असतो.

महापालिका प्रशासनाकडून नेरुळ, सेक्टर-२ येथील मलनिस्सारण केंद्राजवळील चौक (नर्सरी, एलआयजी मधील रस्ता) तसेच जुईनगर, सेक्टर-२५ येथील तिरंगा, जुई, आनंदवन, भारत या 'सिडको'च्या गृहनिर्माण सोसायटीसमोरील रस्त्यावर विकासकामे करताना खोदकाम केलेले आहे. परंतु, काम संपल्यावरही रस्त्याची डागडुजी न झाल्याने स्थानिक रहिवाशांना समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सदर ठिकाणच्या रस्त्यावरील खड्डे बुजवून डागडुजी करुन स्थानिक जनतेला दिलासा देण्याची मागणी विद्या भांडेकर यांनी सदर निवेदनाद्वारे महापालिका प्रशासनाकडे केली आहे.




नवे शहर
आपलं नवे शहर वाचक संवाद! आम्हालाही काही सांगायचंय !!

### शेवटी मतदारराजा हाच बलवान..तो योग्य निर्णय घेईल



महाराष्ट्र हे कर्तृत्वास प्राधान्य देणार राज्य आहे, आभासी जगात खोट्याचं तुणतुणं जास्त दिवस वाजवता येत नाही हे जनतेला कळून चुकले आहे. समाजाचा सर्वांगीण विकास करण्याला जनता डोक्यावर घेते आणि माज आल्यास पायीही तुडवते हे बऱ्याच वेळा निवडणुकीच्या निकालावरून दिसून आले आहे. मातीत काम करणाऱ्या शेतकऱ्याला आपल्या आजूबाजूच्या घटनेचा मागोवा असतोच. म्हणून चांगलं काय आणि वाईट काय याची शहानिशा करून तो मतदानाला उतरत असतो. येणारा काळ हा राजकीय प्रस्थापितांना शाळा दवाखाण्यासाठी प्रश्न विचारणारा असेल आणि मतदार त्याचं सद्यस्थितीला या प्रश्नच उत्तर स्वत:देखील शोधण्याचा प्रयत्नांत आहे. **- सुनिल जाधव, आप अध्यक्ष : तुर्भे.**

### या स्थितीत मतदार भाजपला संधी देऊ शकतील



मविआची लढाई फक्त विरोध दर्शविण्यासाठी होती. त्यामुळे त्यांच्या घटक पक्षांनी काही राज्यांत उभे केलेले उमेदवार पूर्णत: अयशस्वी होणार हे अपेक्षित होते. लोक कोठल्याही राज्यांतील असली तरीही लोकसभा, विधानसभा, किंवा स्थानिक पालिका, ग्रामपंचायत स्तरावर प्रत्येकवेळी पक्ष पाहून मतदान करीत नाहीत. बऱ्याचदा मतदारसंघात विश्वासाने काम करणाऱ्यांना निवडले जाते. शिवाय नुकताच झालेल्या निवडणुकांत भाजपाने केलेला निर्धार आघाडीकडे दिसला नाही. किमान निवडणुकांपुरते तरी एकमत होऊ शकत नाही ते एकमताची सत्ता काय देणार, असा मतप्रवाह लोकांमध्ये प्रचलित झाला आहे. आघाडीने कितीही चांगली कामे केली तरीही त्यांच्या विरोधात भाजपाचा प्रचार लोकांना पटतोय, त्यामुळे राज्यातील लोक मविआ घटक पक्षांच्या उमेदवारांना दूरच ठेवण्याची शक्यता जास्त आहे. मविआ नेत्यांची नावे मोठी आहेत; परंतु त्यांच्या सहकाऱ्यांनी अर्धवट सोडलेल्या कामांचा गोंधळ पाहता आशावाद निर्माण केलेल्या भाजपला लोकांनी एक संधी दिल्यास आश्चर्य वाटू नये.

**- राजन पांजरी, जोगेश्वरी.**

### या निकालांनंतरचे वातावरण भाजपला पोषक



नुकताच पाच राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत चार राज्यात मिळालेल्या यशामुळे भाजपची ताकद वाढली आहे व लोकांचा मोदींच्या नेतृत्वावर विश्वास आहे हे सिद्ध झाले आहे. त्याचा फायदा भाजपला महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विविध महापालिका निवडणुकांमध्ये होणार हे नक्की. त्यातच भाजपने महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्षाच्या अनेक नेत्यांचा भ्रष्टाचार, देशविरोधी कारवाया उघडकीस आणल्यामुळे जनमानसातील प्रतिमा डागाळली आहे. शिवसेनेच्या मुंबई महानगरपालिकेतील मोठ्या नेत्यांवर आयकर विभागाने घातलेल्या धाडींतून त्यांनी पदावर असताना कमावलेली अफाट संपत्ती पाहून थक्क झालेल्या लोकांसमोर शिवसेनेचे खरे रूप आले आहे. मराठीच्या नावावर मते मिळवणाऱ्या शिवसेनेने सत्तेसाठी राष्ट्रवादी आणि काँग्रेस सोबत हातमिळवणी केल्यामुळे शिवसेना मराठी मतांपासून दूर जातेय. महाविकास आघाडीचा भोंगळ कारभार, मंत्रिमंडळात असलेला समन्वयाचा अभाव, भ्रष्टाचार, सुंदोपसुंदी यांना मतदार वैतागल्यामुळेही भाजपची बाजू मजबूत होत आहे. म्हणूनच महानगरपालिकांवरही भाजपचा झेंडा फडकेल असे वाटते. **- बकुल बोरकर, विले पारले.**

### ही भाजप लाट नसल्याने महाराष्ट्रात भाजपला फायदा होणार नाही



पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांत चार राज्यांत भाजपाला घवघवीत यश मिळाले. पंजाबमध्ये आम आदमी पक्षाने आश्चर्यकारक विजय मिळविला. वास्तविक पाहता पंजाबमध्येच काँग्रेसचे सरकार अस्तित्वात होते. बाकीच्या चार राज्यांत भाजपच सत्तेवर असल्याने या निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या यशाला मोदींची लाट वगैरे म्हणता येणार नाही. या विजयाचा महाराष्ट्रातील आगामी काळात येणाऱ्या निवडणुकांमध्ये निश्चितच भाजपाला सहानभूती मिळू शकते. मात्र या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडी सरकार मधील शिवसेना, राष्ट्रवादी आणि विशेष करुन काँग्रेसने अंतर्गत कलहामुळे काय घडू शकते आणि त्याचे गंभीर परिणाम काय होऊ शकतात याचा चांगलाच धडा घेतला आहे. त्यामुळे भाजपा किती जरी म्हणत असला उत्तर प्रदेश झांकी है, महाराष्ट्र अभी बाकी है हे जरी सत्य असले तरी भाजपाचे सत्तेचं स्वप्न पूर्ण होणार नाही. महाविकास आघाडी सरकारमध्ये कुरबुरी असल्या किंवा तिन्ही पक्ष वेगवेगळे लढले तरी भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी निवडणुकीनंतर पुन्हा महाविकास आघाडी स्थापन होऊ शकते.

**- राजू जाधव, मांगूर, जिल्हा बेळगांव.**

### सत्ताप्राप्ती... एवढेच राजकीय पक्षांना समजते



पाच राज्यांच्या निवडणूकांत भाजपने चार राज्यात बहुमत मिळवले; तर काँग्रेसने आपल्याच कर्मदरिद्रीपणामुळे पंजाब सारखे महत्त्वाचे राज्य गमावले. काँग्रेस जनतेला हवी असली काँग्रेसच्या भवितव्याबाबत शिर्षस्थ नेतृत्वापासुन सगळेच गंभीर दिसत नाही. भाजप निर्विवादपणे देशभर आपले वर्चस्व सिद्ध करीत आहे. अर्थात भाजप आणि परिवाराची संघटन शक्ती याचे मोठे योगदान आहे. दोन वर्षांपूर्वी राज्यात 'मी पुन्हा येईन' चा प्रयोग फसला असला तरी, पुन्हा येण्यासाठी येनकेन प्रकाराने प्रयत्न होतच रहाणार. त्यातच आपल्या विरोधी पक्षाच्या सरकारांना अडचणीत आणण्यात कुठलीही कसर सोडायची नाही अशी भाजप परिवाराची मानसिकता आणि कार्यपद्धती आहे. म्हणूनच तर भाजप नेते वारंवार वेगवेगळे मुहुर्त जाहीर करीत असतात. त्यातच राज्यात तीन पक्षांच्या वेगवेगळ्या विचारधारा. केवळ सत्ताकारणासाठी एकोप्याने रहाण्याचा प्रयत्न. पाच वर्षे सरकार टिकेल असा 'मविआ' ला विश्वास असला तरी मविआ मध्ये तीन तिघाडा काम बिघाडाचे हर तहेने प्रयत्न होणार. भाजप अजुनही शिवसेनेकडुन आशा बाळगून आहे. त्याचबरोबर पहाटेच्या शपथविधीची पुनरावृत्ती होणारच नाही याची कोणतीही शाश्वती नाही. सगळ्यांचे ध्येय एकच असते सत्ता, सत्ता आणि फक्त सत्ता. **- अनंत बोरसे, शहापूर, जिल्हा ठाणे.**

### महाराष्ट्रातील आगामी निवडणुकीवर निश्चितच परिणाम होईल



भाजपने केंद्रातील सत्ता सलग दोन वेळा व उत्तर प्रदेश मधील सत्ताही लागोपाठ दुसऱ्यांदा मिळवली आहे. तसेच उत्तर प्रदेश मध्ये बेरोजगारीमुळे हेच बेरोजगार गटागटाने मुंबई, गुजरात या प्रांतात येतात. प्रगतीशील उत्तर प्रदेश राज्य असं प्रचार करत असताना उत्तर प्रदेश सारख्या मोठ्या प्रगतीशील राज्यातून इतर प्रांतात रोजी-रोटी साठी एवढे सगळे जातातच कसे? तसेच महाराष्ट्र राज्यात पोटापाण्यासाठी उत्तर प्रदेशातून असंख्य लोक येतातच कसे? उत्तर प्रदेश राज्यातील लोकांचे लोंढे महाराष्ट्रात येत आहेत. ते लोंढे कधी थांबणार? महाराष्ट्र राज्यातील भूमीपूत्रांना नोकरी रोजगार कधी उपलब्ध होणार? असा प्रश्न योगी आणि भाजपला विचारला पाहिजे. या निवडणुकांकडे लोकसभेची सेमीफायनल म्हणून पाहिलं जात होतं आणि सेमीफायनलमध्ये पाच पैकी चार राज्य आपल्या ताब्यात ठेवून भाजपाने अपूर्व यश मिळवले आहे. एकंदरीत भाजपने देशातील राजकारणात निर्विवाद वर्चस्व सिद्ध केल्याचा परिणाम महाराष्ट्र राज्यातील आगामी निवडणुकीवर निश्चितच होईल. **- लक्ष्मण राजे, मीरा रोड.**

### गुन्हेगार पकडण्यात कितपत या सीसीटीव्हींचे कितपत सहकार्य?

हल्ली जिकडे तिकडे सीसीटीव्ही बसवण्याचे पेव फुटले आहे. प्रत्यक्ष गुन्हे घडल्यावर काहीवेळा विशिष्ट सीसीटीव्ही नादुरुस्त होते, नीट दिसत नव्हते वगैरे प्रकारची उत्तरे मिळतात व तक्रारदारांना वाटेला लावले जाते. केवळ टीव्ही वरील गुन्हेगारी मालिकांमधील सीसीटीव्हीच व्यवस्थित चालतात.. प्रत्यक्ष जीवनातले नाहीत, अशी लोकमानसाची धारणा होत आहे. याबद्दल वाचकांना काय वाटते ते सात ते आठ ओळींत आपले नाव, राहण्याचे ठिकाण, फोटोसह आमच्या ईमेल वर कळवा.

9967520006 E-mail :contact@naveshahar.com
आपलं नवे शहर वाचक संवाद! आम्हालाही काही सांगायचंय !!



'कैलाशचंद्र प्रकाशन'चे 'आपलं नवे शहर' हे दैनिक मालक-मुद्रक कैलाश गिंदोडीया यांनी सिध्दकला प्रिंट मिडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट नंबर डब्ल्यू-२३०, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, खैराणे, एमआयडीसी, नवी मुंबई, जिल्हा-ठाणे-४००७१० येथे मुद्रित करुन, प्रकाशक शिव गिंदोडीया यांनी १३१३/१३१४, १३वा मजला, रिअल टेक पार्क, प्लॉट नंबर-३९/२, सेक्टर-३०ए, वाशी, नवी मुंबई-४००७०३ येथून प्रकाशित केले. ■ABC Certificate no. 133/2105 ■दुरध्वनी - ०२२ २७८१५३८०. ■फॅक्स - २०८७०५१३. ■संपादक: शैलेश जाधव ■RNI No.- 61792/94.